# अर्थशास्त्र
# एम.ए. द्वितीय वर्ष (सेमिस्टर IV)
## Subject:- Financial Institutions and Markets-II

- डॉ. लखन इंगळे

## मुद्रा बाजार
## Money Market

सामान्यपणे ज्या ठिकाणी ग्राहक व विक्रेते खरेदी-विक्री करावयाच्या वस्तूंची किंमत ठरवितात व देवाण-घेवाण करतात, अशी जागा म्हणजे बाजार होय. ज्या प्रकारच्या वस्तूंची बाजारात देवाण-घेवाण केली जाते, त्यानुसार बाजाराचे वर्गीकरण करण्यात येते. उदा. कपडा बाजार, धान्य बाजार, भाजी बाजार इत्यादी. याप्रमाणे बाजाराची संकल्पना लक्षात घेतली तर मुद्रा बाजार म्हणजे ज्या बाजारात मुद्रेची खरेदी-विक्री केली जाते असा बाजार होय. देशाच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचा व क्रियाशील घटक म्हणून मुद्रा बाजार ओळखला जातो. मुद्रा बाजाराचा देशातील एकूण अर्थव्यवस्थेवर फार मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडतो. या बाजारात अल्पमुदतीच्या कर्जाची मागणी करणाऱ्या व्यक्ती आणि पुरवठा करणाऱ्या व्यक्ती एकत्रित येत असतात. त्यांच्यात देवाण-घेवाणीचे व्यवहार होतात. यामुळे शेती, उद्योग, व्यवसाय, व्यापार, सेवाक्षेत्र इत्यादींना कर्जाचा पुरेसा व सातत्याने पुरवठा होतो. त्यामुळे देशातील विविध क्षेत्रातील एकूण उत्पादन वाढण्यास चालना मिळते. वाढत्या उत्पादनामुळे बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होवून त्यांच्या उत्पन्नात वाढ होते. परिणामत: एकूणच देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळते.

**मुद्रा बाजार : अर्थ (Meaning of Money Market)-** ज्या बाजारात अल्प मुदतीची कर्जे दिली किंवा घेतली जातात अशा बाजाराला ' मुद्रा बाजार' असे म्हणतात. या बाजारात शेतकरी, लहान व्यापारी, व्यावसायिक, उद्योजक, बँका, गुंतवणुक संस्था, सरकार

इत्यादी घटकांकडून अल्प मुदतीची कर्जे मागीतली जातात, तर मध्यवर्ती बँक, व्यापारी बँका, गुंतवणूक संस्था, विमा कंपन्या, विविध विश्वस्त संस्था यांच्याद्वारे अल्प मुदतीच्या कर्जाचा पुरवठा केला जातो. हा कर्जव्यवहार करण्यासाठी विविध प्रकारची पतसाधने वापरली जातात. उदा. हुंड्या, धनादेश, कर्जरोखे, सरकारी रोखे, वचनचिठ्ठ्या, पतपत्रे, व्यापारी पत्रे, विनिमय पत्रे, कोषागार हुंड्या इत्यादी. थोडक्यात, पैशाचा व्यवहार करणाऱ्या संस्था व व्यक्ती, या व्यवहारातून निर्माण होणारे दस्तऐवज, ते दस्तऐवज हाताळणाऱ्या संस्था आणि त्या व्यवहारांचे नियमन करणारे घटक या सर्वांचा मिळून हा नाणेबाजार तयार होत असतो.

मुद्रा बाजार ही संज्ञा विशिष्ट जागा दर्शवित नाही. मुद्रा बाजार म्हणजे संस्थांचा एक गट असून कर्ज देणारे आणि कर्ज घेणारे यांना एकत्रित आणणारी व्यवस्था आहे. या बाजारात अल्पकालीन निधीचा पुरवठा आणि मागणी निर्धारीत करणारे सर्व प्रकारचे घटक कार्य करीत असतात. मुद्रा बाजाराचे वेगळेपण दर्शविणारे वैशिष्ट्य म्हणजे येथे अल्पकालीन निधीचे व्यवहार चालतात. व्यापारी बँका या मुद्रा बाजारातील अल्पकालीन निधीचे प्रमुख स्त्रोत आहे. या बँका मुद्रा बाजारातील संस्था आणि व्यापारी यांना वित्तीय पुरवठा करणाऱ्या महत्वाच्या संस्था आहेत.

मुद्रा बाजारात अनेक उपबाजार असतात. मागणी देय कर्जबाजार, कोषागार हुंडी बाजार, व्यापारी हुंडी बाजार, ठेव दाखल्यांचा बाजार, व्यापार पत्र बाजार, देशी बाजार, यासारखे अनेक उपबाजार पैसा बाजारात दिसून येतात. अद्यापही मुद्रा बाजाराचा पाहिजे तेवढा विकास घडून आलेला नाही. मुद्रा बाजारातील असंघटीत क्षेत्राचे अस्तित्व हे मुद्रा बाजाराचे मागासलेपण सिद्ध करते. मुद्रा बाजारातील त्रुटी दूर करण्यासाठी विविध नियम व कायदे केले आहेत.

**मुद्रा बाजाराची व्याख्या (Definition of Money Market)-**

अल्पकालीन स्वरुपात होणाऱ्या कर्जाच्या व पैशाच्या व्यवहारांना एकत्रितपणे 'मुद्रा बाजार' असे म्हटले जाते. मुद्रा बाजारातील संसाधने ही तरल स्वरुपाची असतात. मुद्रा बाजार विधिग्राह्य मुद्रा चलन, धनादेश, वचनचिठ्ठ्या, व्यक्तीहुंड्या, व्यापारी पत्रे अशा विविध संसाधनांचा उपयोग केला जातो. मुद्रा बाजाराच्या संकल्पनेला एक विशिष्ट अर्थ असून त्या संबंधीत काही महत्वपूर्ण व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

**प्रो. क्राऊथर यांच्या मते,** "विधीग्राह्य प्रकारच्या मुद्रेचे देणाण-घेवाण व्यवहार करणाऱ्या विविध उत्पादक संस्थांना सामुहिकपणे वित्तीय पुरवठा करणारी प्रभावी संस्था म्हणजे मुद्रा बाजार होय."

("Money market is the effective name given to be the various firms and institutions that deals in the various grades of near money" - **Prof. Crowther**.)

**केंद्रीय बँकेच्या मते,** "मुद्रेच्या स्वरुपात संपत्तीचे कमी मुदतीचे व्यवहार करणारे केंद्र म्हणजे मुद्रा बाजार होय. मुद्रा बाजार वर्गदारांच्या अल्पमुदतीच्या गरजा पूर्ण करते आणि कर्ज उपलब्ध करुन देणाऱ्या धनकोंना रोखता देते."

("A money market is the centre for dealing mainly of short term character in monetary assets, in meets the short term equipment of borrower and provide liquidity to the tenders."- **Reserve Bank of India**.)

**आधुनिक अर्थशास्त्रीय शब्दकोषाच्या मते,** "मुद्रा बाजार ही एक संज्ञा असून जी कमी मुदतीच्या पत साधनांची खरेदी विक्री आणि हस्तांतरणाची कार्ये हाताळणी करणाऱ्या वित्तीय संस्थांना लागू होते."

("Money market is the term designating the financial institutions, which handle the purchase sale and transfer of short term credit Instuments")

**श्री. मॅडन व नॅडलर यांच्या मते**, "ज्याद्वारे अल्पकालीन स्वरुपात निधी कर्जाऊ दिला जातो व घेतला जातो आणि ज्याद्वारे देशातील बहुतांश आर्थिक व्यवहारांचे निरासन केले जाते त्या यंत्रणेस मुद्रा बाजार म्हणतात."

("The money market in a mechanism through which short term funds are loaned borrowed and through which a large part of financial transactions of a particular country or of the world are cleared."- **Modden and Nadler**)

**मुद्रा बाजाराची वैशिष्ट्ये (Features of Money Market)-**

मुद्रा बाजाराची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येईल -

१. मुद्रा बाजारात अल्पकालीन कर्जाच्या देवघेवीचे व्यवहार होतात.

२. मुद्रा बाजारात मध्यवर्ती बॅक, वित्तीय संस्था, व्यक्ती व सरकारांचा समावेश होतो.

३. मुद्रा बाजारातर्फे बॅका, वित्तीय संस्था, अन्य संस्था व व्यक्ती यांच्याकडून अल्पकालीन कर्जासाठी पुरवठा केला जातो.

४. हे व्यवहार वचनचिठ्ठ्या, हुंड्या, कर्ज रोखे, सरकारी रोखे, पतपत्रे, कोषागार हुंड्या इत्यादी दस्तऐवजांच्या आधारे होतात.

५. मुद्रा बाजारात मुद्रेसम अथवा निकटमुद्रा दस्तऐवजांच्या प्रकारानुसार वेगवेगळे उपबाजार संघटीत होतात. उदा. हुंडी बाजार, रोखे बाजार इत्यादी.

६. मुद्रा बाजारातील संस्था व व्यक्ती ऋणकोच्या मागणीनुसार किंवा बोलीनुसार कर्ज देतात.

७. मुद्रा बाजारात कर्जाची मागणी करणाऱ्या ऋणकोंच्या गरजा पूर्ण केल्या जातात.

८. कर्ज देणाऱ्या धनकोंना व्यवहारांसाठी रोखता उपलब्ध करुन दिली जाते.

**मुद्रा बाजाराची उद्दिष्ट्ये (Objectives of Money Market)-**

मुद्रा बाजाराची ही एक व्यापक संकल्पना आहे. मुद्रा बाजारात अल्पमुदतीची कर्जे दिली व घेतली जातात. मुद्रा बाजार देशाच्या आर्थिक विकासात महत्वाची भूमिका वठवित असते. त्याची प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत -

१. देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेत आर्थिक संतुलन निर्माण करणे.

२. कर्जदार आणि गुंतवणूकदार यामध्ये मध्यस्थीची भूमिका पार पाडणे.

३. देशाचे मौद्रिक धोरण अंमलात आणणे.

४. अल्पमुदतीच्या कर्जाची देवाण-घेवाण करणे.

५. उद्योग व व्यापाराच्या भांडवलाची आवश्यकता पूर्ण करणे.

६. विविध निधी उभारणे आणि सुव्यवस्थित परिचलनाचे कार्य करुन केंद्रिय बॅकेला मदत करणे.

७. उद्योग - व्यवसायाला लागणाऱ्या खेळत्या भांडवलाची गरज पूर्ण करणे.

८. देशाची मुद्रेविषयक माहिती सातत्याने रिझर्व्ह बॅकेला कळविणे.

९. मुद्रा बाजाराच्या उपबाजारांचा विकास करणे.

१०. विनिमय विपत्रे, ठेव प्रमाणपत्रे इ. साधनांचा विकास करणे.

११. देशातील विविध स्वरुपाच्या निष्क्रिय निधी सक्रीय करणे.

१२. मुद्रा बाजाराच्या माध्यमातून व्यापारी बँका, सहकारी बँका इत्यादींचा विकास करणे.

१३. भांडवलाच्या गतीशीलतेत वाढ करणे.

१४. एकूणच देशाच्या अर्थव्यवस्थेला संचारीत ठेवून मुद्रा विषयक गरजा पूर्ण करणे.

## मुद्रा बाजाराचे घटक (Components of Money Market)-

मुद्रा बाजाराचे अनेक विभाग व उपविभाग असून ही संघटना बरीच विस्कळीत स्वरुपाची असते. मुद्रा बाजाराच्या निरनिराळ्या विभागाबाबत संघटना आणि तंत्राच्या दृष्टीने बरीच भिन्नता असूनही त्यामध्ये एक सामान्य गुण आहे तो म्हणजे या सर्व विभागांमध्ये अल्पकालीन कर्जाची देवाण-घेवाण चालते. प्रत्येक विभागाचा दुसऱ्या विभागाशी अत्यंत घनिष्ठ असा संबंध असतो आणि एका विभागातील परिस्थितीचा दुसऱ्या विभागावर परिणाम होणे अपरिहार्य असते.

**अ. प्रमुख मुद्रा बाजार**

१. मागणीदेय मुद्रा बाजार
२. स्वीकृत बाजार
३. हुंडी बाजार
४. अल्पकालीन रोखे बाजार
५. वाणिज्य पत्र बाजार
६. तारण कर्ज बाजार
७. संघ निधी बाजार

**ब. भांडवली बाजार**

**क. वस्तू बाजार**

**ड. विदेशी हुंडी बाजार**

**इ. धातू बाजार**

**फ. जहाज वाहतुक बाजार**

**ग. विमा बाजार**

मुख्य मुद्रा बाजाराचे ७ उपविभाग दिसून येतात. यापैकी १ ते ४ उपविभाग महत्वाचे असून ते ज्या प्रमाणात विकसीत झालेले असतील त्या प्रमाणात देशाचा मुद्रा बाजार विकसीत होतो. संघनिधी मुद्रा बाजार केवळ न्यूयार्कच्या मुद्रा बाजारात अस्तित्वात आहे. यामधील मुद्रा बाजारात सामान्यत: आढळून येणाऱ्या प्रमुख उपबाजारांची रचना खालीलप्रमाणे आहे.

## १. मागणीदेय मुद्रा बाजार (Call Money Market)-

मागणीदेय मुद्रा बाजार अत्यंत अल्पकालीन कर्जाच्या देवघेंवीचा बाजार असतो. हुंडी बाजारातील तसेच रोखे बाजारातील दलालांना स्वत:साठी तसेच ग्राहकांसाठी हुंड्याची आणि रोख्यांची खरेदी-विक्री करतांना अल्पकाळासाठी भांडवलाची गरज पडते. हे अल्पकालीन कर्ज व्यापारी बँका पुरवितात. हे कर्ज बँका मागताक्षणी किंवा सूचना देवून सात दिवसाच्या आत परत करण्याच्या कराराने दलालांना देतात. हे कर्ज ताबडतोब किंवा अल्पसूचनेने परत मागविता येत असल्यामुळे या कर्जाला मागणी देय कर्ज असे म्हणण्याचा प्रघात आहे. या कर्जावर बँका अतिशय कमी दर आकारतात. त्यामुळे हे कर्ज दलालांना अत्यंत सोयीचे व स्वस्त पडते. हे कर्ज ताबडतोब परत मागता येत असल्यामुळे ते जवळपास रोकडी सारखेच असते. यामुळे बँका हे कर्ज म्हणजे आपला दुय्यम रोखनिधी समजतात.

## २. स्वीकृती बाजार (Acceptance Market)-

व्यवहारांमधून निर्माण होणाऱ्या हुंड्या बँकांनी स्वीकारल्या म्हणजे त्यांना स्वीकृत विपत्र असे म्हणतात. अशा प्रकारे हुंड्या स्विकारणाऱ्या स्वतंत्र संस्था लंडनच्या मुद्रा बाजारात अस्तित्वात आहेत. या संस्थांना स्विकृती गृहे असे म्हणतात. स्विकृती गृहांनी स्विकारलेल्या किंवा हमी घेतलेल्या हुंड्या कोणत्याही मुद्रा बाजारात विकणे किंवा वटविणे सुलभ जाते.

## ३. हुंडी बाजार (Bill Market)-

अल्पकालीन हुंड्यांच्या खरेदी-विक्री व्यवहार करणाऱ्या बाजाराला हुंडी बाजार असे म्हणतात. लंडनचा हुंडी बाजार सुप्रसिद्ध आहे व तेथे हुंड्यांचे व्यवहार करणाऱ्या स्वतंत्र संस्था आहेत. त्यांना वटावगृहे असेही म्हणतात. पहिल्या युद्धाच्या सुरुवातीपर्यंत लंडनच्या

मुद्रा बाजारात ह्या हुंडी व्यवहाराला फार महत्व होते. युद्धानंतर हुंड्यांचे महत्व कमी झाले असून त्यांची जागा सरकारने काढलेल्या अल्पकालीन कर्ज रोख्यांनी किंवा ट्रेझरी हुंड्यांनी घेतली आहे.

**४. अल्पकालीन सरकारी रोखे बाजार (Market for Short-term Government Securities)-**

अलीकडे सर्वच देशांमध्ये अल्पकालीन सरकारी कर्ज रोख्यांचे प्रमाण खूपच वाढले आहे. या कर्ज रोख्यांचे प्रमुख दोन प्रकार दिसून येतात.

**अ)** सुरुवातीलाच अल्पकाळासाठी काढलेले कर्ज रोखे, ९ महिने पर्यंत मुदत असणाऱ्या ट्रेझरी हुंड्याही अल्पकालीन कर्ज रोखेच आहेत. इतर अल्पकालीन रोख्यांची मुदत २ ते ५ वर्षपर्यंतही असू शकते.

**ब)** ज्यांची मुदत १ वर्षापर्यंत असते असे सरकारी कर्ज रोखे दीर्घकालीन स्वरुपाचे असतात. सुरुवातीला १० वर्ष किंवा १५ वर्षे किंवा त्यापेक्ष जास्त मुदतीसाठी काढलेल्या सरकारी रोख्यांची मुदत पूर्ण व्हावयास आली की, ट्रेझरी हुंड्या किंवा इतर अल्पकालीन रोख्यांसारखेच ते रोखे स्वरुपाचे असतात. त्यांचेवर व्याजही अधिक असते. त्यामुळे बँका अशा कर्जरोख्यांमध्ये पैसा गुंतवायला उत्सुक असतात.

वरील निरनिराळे उपविभाग व्यवहारांच्या दृष्टीने भिन्न असले तरी ते परस्परांशी जवळचे व अवलंबून असतात. एका उपबाजारात व्यवहार करणारे दलाल किंवा ग्राहक इतरही उपबाजारात अनेकदा व्यवहार करतांना आढळून येतात.

'ब' पासून 'ग' पर्यंतचे बाजार मुद्रा बाजाराचे घटक नाहीत. परंतु ते मुद्रा बाजाराचे आधारस्तंभ आहेत. इतर बाजारांच्या अस्तीत्वामुळे पैशाची सतत मागणी निर्माण होते. आणि

मुद्रा बाजारातील पैसा गुंतविण्याला वाव मिळतो. कोणत्याही आर्थिक केंद्रात प्रत्यक्ष संबंध असणारे असे विविध बाजार जेवढे अधिक आणि त्यांचा आकार जेवढा मोठा तेवढी पैशाची मागणी अधिक राहून मुद्रा बाजाराचा पाया भक्कम आणि मजबूत होत जाईल.

## मुद्रा बाजाराचे संघटन (Organization of Money Market)-

सामान्यपणे मुद्रा बाजाराचे नियमन व नियंत्रण त्या देशातील मध्यवर्ती बँक करते. मुद्रा बाजारात कार्य करणाऱ्या घटकांचे मिळून मुद्रा बाजाराचे संघटन अस्तित्वात येत असते. देशाची मध्यवर्ती बँक त्या घटकांमध्ये समन्वय व सहसंबंध निर्माण करण्याचे कार्य करते व त्यामुळे मुद्रा बाजाराचे संघटीत स्वरुप दिसून येते.

**मुद्रा बाजाराचे संघटन**

| कर्ज देणाऱ्या संस्था | मध्यस्थ संस्था | कर्ज घेणाऱ्या संस्था |
|---|---|---|
| १.मध्यवर्ती बँक | १.वटाव गृहे | १.उद्योग संस्था |
| २.व्यापारी बँका | २.स्वीकृती गृहे | २.कंपन्या |
| ३.वित्तीय बँका | ३.हुंडी मालक | ३.भागीदारी संस्था |
| ४.सहकारी बँका | ४.रोखे दलाल | ४.एकल व्यापारी संस्था |
| ५.गुंतवणूक कंपन्या | ५.भाग दलाल | ५.लघु उद्योजक |
| ६.सराफी पेढ्या | ६.दलाली पेढ्या | ६.व्यापारी |
| ७.सावकार | ७.दलाल संघटना | ७.कारखानदार |
| ८.अन्य देशी संस्था | | ८.सरकार |
| | | ९.व्यापारी बँका |
| | | १०.सहकारी बँका |

मुद्रा बाजाराचे असे संघटीत स्वरुप दिसत असले तरी प्रत्यक्षात मुद्रा बाजार हा देशभर विखुरलेल्या स्वरुपातच दिसतो.

### मुद्रा बाजाराचे कार्य (Functions of Money Market)-

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत त्या देशाच्या मुद्रा बाजाराला महत्वाचे स्थान प्राप्त झालेले असते. मुद्रा बाजाराच्या विकासामुळे देशाच्या व्यापार विषयक, औद्योगिक आणि संपूर्ण आर्थिक विकासाला मदत होते. देशाच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाबरोबर मुद्रा बाजारही विकसीत होतो आणि नाणे बाजाराचे व्यवहार अधिक गतिमान व तरल होतात. देशाची बँकींग व चलनव्यवस्था सुद्धा मुद्रा बाजाराच्या गतिमानतेवर अवलंबून असते. देशाच्या मुद्रा बाजारामुळे उद्योग संस्था, व्यापारी संस्था, संयुक्त भांडवली क्षेत्र विदेशी व्यापार, बँकींग क्षेत्र या सर्वांच्या विकासाला चालना मिळते. मुद्रा बाजाराचे कार्य पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### १. व्यापार उद्योगाला वित्त पुरवठा -

मुद्रा बाजारामुळे व्यापार व उद्योगाला सुलभतेने व आवश्यक त्यावेळी वित्त पुरवठा उपलब्ध होतो. उद्योगांच्या गरजेनुसार कर्ज मिळण्याची व कर्ज उभारण्याची सोय मुद्रा बाजारामुळे शक्य झाली आहे. उद्योगधंद्याना आपली भांडवलाची गरज पूर्ण करता येते. मुद्रा बाजारातील व्यवहारांचा आणि व्याजाच्या दराचा परिणाम भांडवली बाजारातील व्यवहारांवर तसेच व्याजाच्या दरावरही होत असतो.

### २. सरकारी कर्जाची उभारणी सुलभ

सरकारला अंदाजपत्रकीय तुटीच्या काळात मुद्रा बाजाराचे विशेष महत्व असते. मुद्रा बाजारात ट्रेझरी (सरकारी कोषागार) हुंड्या विकून सरकारला अल्पकालीन गरज भागविता

येते. मुद्रा बाजाराच्या अभावी सरकारला एकतर चलन फुगवटा करुन किंवा मध्यवर्ती बँकेकडून कर्ज घेवून आपली गरज भागवावी लागते. याचा परिणाम देशातील चलन फुगवटा वाढून भाववाढ होते. मुद्रा बाजारात अल्पकालीन कर्ज घेण्याची सोय असल्यामुळे सरकारला चलन पुरवठा करण्याचे संकट टाळता येते.

### ३. व्यापारी बँकांना निधी गुंतवण्याची सोय

ठेवीच्या स्वरुपात बँकेकडे जमा असलेला प्रचंड निधी सुरक्षितपणे व योग्य प्रकारे गुंतवण्याची सोय मुद्रा बाजारामुळे प्राप्त झाली आहे. मुद्रा बाजारामुळे व्यापारी बँकांना आपला निधी कर्ज रुपाने गुंतवण्याची संधी प्राप्त होते. बँकांना परत कर्ज बाजारात आणि हुंड्यामध्ये पैसा गुंतविण्यास सुरक्षितता राखून उत्पन्न मिळविण्याची सोय उपलब्ध होते. तसेच बँक देखील आवश्यकता वाटल्यास नाणे बाजारातून पैसा उधार घेवू शकतात.

### ४. विदेशी व्यापारास मदत

आयात-निर्यात व्यापारासाठी भांडवल उभारण्याच्या दृष्टीने सुद्धा मुद्रा बाजाराचा उपयोग होतो. आयात-निर्यात व्यापारासाठी अनेकदा अल्पमुदतीच्या मोठ्या कर्जाची गरज पडते. मुद्रा बाजारात हुंड्यांच्या आधारे मोठे कर्ज उभारता येते. निर्यात वृद्धीसाठी सुद्धा मुद्रा बाजाराची प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत होते.

### ५. पतनियंत्रणात सुलभता

मुद्रा बाजारामुळे मध्यवर्ती बँकेचे पतनियंत्रणाचे कार्य सुलभ व अधिक परिणामकारक ठरते. मुद्रा बाजारामुळे पतनियंत्रणाच्या विविध साधनांचा परिणामकारकपणे उपयोग करता येतो तसेच अपेक्षित परिणाम साध्य करता येतो. सुसंघटीत मुद्रा बाजारामुळे मध्यवर्ती बँकेच्या पतनियंत्रण धोरणाची परिणामकारकता वाढते.

**६. भांडवलाच्या गतिशीलतेत वाढ**

मुद्रा बाजारामुळे देशातील भांडवलाची गतिशीलता वाढण्यास मदत होते. खाजगी भांडवलाच्या गुंतवणूकीस योग्य वातावरण निर्माण होते. गुंतवणूकदारांना गुंतवणूकीच्या सोयी प्राप्त होतात. सुदृढ व प्रगत मुद्रा बाजारामुळे भांडवलाची गतिशीलता वाढते.

**७. आर्थिक साधनांचा महत्तम उपयोग**

मुद्रा बाजारामुळे देशातील आर्थिक साधनांची गतिशीलता वाढून त्या साधनांचा जास्तीत जास्त उपयोग करण्याची संधी उपलब्ध होते. मुद्रा बाजारामुळे ही साधने अधिक गतिशील सुद्धा बनतात. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेलाही लाभ होतो.

**८. आर्थिक विकासाला चालना**

मुद्रा बाजारामुळे देशाच्या आर्थिक व औद्योगिक विकासाला चालना मिळते. संघटीत व विकसीत मुद्रा बाजारामुळे उद्योग, व्यवसाय व व्यापार या सर्व क्षेत्रांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या सोयी उपलब्ध होतात.

**९. बँकींग क्षेत्राचा विकास**

मुद्रा बाजारामुळे देशाच्या बँकीग क्षेत्राचा संतुलीत व जलद विकास होवू शकतो. बँकीग क्षेत्रास स्थैर्य प्राप्त करुन देण्यासाठी व बँकींग व्यवसाय भक्कम होण्यासाठी मुद्रा बाजाराची फार मदत होते.

मुद्रा बाजार देशाचा अतिशय महत्वाचा घटक आहे म्हणून मुद्रा बाजार सुसूत्र, कार्यक्षम, गतिशील व संघटीत असणे आवश्यक आहे.

## मुद्रा बाजाराचे महत्व (Importance of Money Market)-

मुद्रा बाजाराची पूर्तता देशाच्या एकूण विकासासाठी महत्वाची भूमिका असते. मुद्रा बाजार देशातील विविध वित्तीय सेवा देणारा एक महत्वपूर्ण घटक आहे. म्हणून जगाच्या कोणत्याही देशात मुद्रा बाजाराला अनन्यसाधारण महत्व दिले जाते. मुद्रा बाजाराचे महत्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १. मुद्रा विषयक माहिती संग्रहीत करणे

मुद्रा बाजाराच्या माध्यमाने देशातील मुद्रा विषयक अद्यावत माहिती संग्रहीत केली जाते. त्याआधारे केंद्रीय बँक स्वत:चे पतनियंत्रण धोरण ठरवू शकते. देशाच्या बँकीग व वित्तीय क्षेत्रावर पतनियंत्रण धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीने केंद्रीय बँक योग्यरित्या नियंत्रण ठेवू शकते.

### २. वित्तीय साधनांना उत्तेजन देणे

मुद्रा बाजाराच्या माध्यमाने गुंतवणूकदाराकडून सुरक्षा हमी आणि योग्य दराने गुंतवणूक स्वीकारली जाते. मुद्रा बाजाराच्या मदतीने कर्जदारांनी आपले कर्ज योग्य वेळी परतफेड करण्याच्या दृष्टीने सतत प्रोत्साहन दिले जाते. विशेषत: धनको-ऋणकोच्या एकूण वित्तीय व्यवहारात मुद्रा बाजार मध्यस्थ म्हणून कार्य करते. मुद्रा बाजाराच्या सकारात्मक धोरणातून देशातील विविध वित्तीय घटकांना प्रेरणा मिळून ते अधिक कार्यक्षमतेने कार्य करतात.

### ३. भांडवलाची गतिशीलता वाढविणे

जगात सर्वच देशात बँकीग व वित्तीय संस्थांचा विस्तार मुद्रा बाजारामुळे शक्य झाला आहे. त्यामुळे प्रत्येक देशातील भांडवलाची गतिशीलता वाढत आहे. परिणामी

वित्तीय बाजारात भांडवलाची मागणी उत्तरोत्तर वाढत आहे. त्याआधारे अनुत्पादक वर्गाद्वारे अतिरिक्त मुद्रा सहजतेने उत्पादक वर्गाकडे वळविणे शक्य होते. मुद्रा बाजार देशातील प्रादेशिक आणि वित्तीय असमतोल दूर करण्याचा स्त्रोत मानला जातो.

**४. निष्क्रिय निधीला सक्रीय करणे**

देशातील मुद्रा बाजाराच्या माध्यमाने विविध क्षेत्रात निष्क्रिय स्वरुपात असलेल्या निधीला सक्रीय करुन अर्थव्यवस्थेच्या प्रवाहात आणण्याचे कार्य केले जाते. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात निष्क्रिय निधीचा उपयोग करुन अर्थव्यवस्थेला अधिक फायदा मुद्रा बाजाराच्या आधारे मिळवून दिला जातो.

**५. गुंतवणूकदारांना सहाय्य करणे**

गुंतवणूकदारांना अतिरिक्त पैसा गुंतवण्यासाठी मुद्रा बाजार महत्वाचे स्त्रोत समजले जाते. कारण मुद्रा बाजाराच्या माध्यमातून गुंतवणूकदारांद्वारे जमा केलेली मुद्रा कर्जदाराच्या मागणीप्रमाणे देण्याला सोयीचे होते. मुद्रा बाजार कर्जदारांना कर्ज विषयक योग्य मार्गदर्शन व सल्ला प्रदान करण्याचे कार्य देखील करीत असते. पर्यायाने गुंतवणूकदारांना आपली अतिरिक्त मुद्रा योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी गुंतवणूक करण्याच्या दृष्टीने मुद्रा बाजार सहाय्यक ठरते.

**६. केंद्रीय बँकेला सहाय्य करणे**

केंद्रीय बँकेच्या खुल्या व्यवहारासाठी मुद्रा बाजार उपयोगी ठरते. देशातील सरकारसाठी निधी उभारणे आणि निधीचे योग्य संचालन करण्यासाठी केंद्रीय बँकेला मुद्रा बाजार सहाय्य करीत असते. ज्या देशातील मुद्रा बाजार संघटीत नसतो त्या ठिकाणी केंद्रीय बँकेला खुल्या बाजारातील व्यवहार करण्याला अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.

### ७. आर्थिक विकासाला सहाय्य करणे

आजच्या वित्तीय युगात मुद्रा बाजार वित्तीय संसाधने आणि सेवाच्या माध्यमाने खाजगी क्षेत्रातील अतिरिक्त स्वरुपाच्या बचती संग्रहीत करण्याचे कार्य करीत असतात. त्यातून आवश्यक त्या क्षेत्रात खाजगी बचतीचा उपयोग योग्य पद्धतीने अंमलात आणला जातो. त्याचा परिणाम भांडवल निर्मितीत वाढ होवून आर्थिक विकासाला गती देण्याला सहाय्यक ठरते. म्हणून मुद्रा बाजाराचे देशाच्या एकूण आर्थिक विकासात महत्वाचे योगदान मिळत जाते.

### ८. एकूण अर्थव्यवस्थेला सहाय्य करणे

मुद्रा बाजार देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेला सहाय्य करण्याचे कार्य करीत असते. देशाच्या अर्थव्यवस्थेतील सर्व वित्तीय साधनांमध्ये एकसुत्रता आणणे, अर्थविषयक मार्गदर्शन करणे, त्यांना योग्य सल्ला देणे आणि सुरक्षितता प्रदान करणे इत्यादी स्वरुपाचे अनेक कार्ये मुद्रा बाजार करीत असते. त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला महत्तम प्रमाणात सहाय्य करण्याचे कार्य पार पाडते.

### मुद्रा बाजाराची आवश्यकता (Need of Money Market)-

देशाच्या जलद आर्थिक विकासासाठी विकसीत व संघटीत मुद्रा बाजार असणे आवश्यक आहे. देशातील व्यापार, उद्योगाची वित्तीय गरज देशातील मुद्रा बाजारापासून पूर्ण होते. वित्तीय सोयींच्या उपलब्धतेवरच व्यापार व्यवसायांचा विकास व विस्तार अवलंबून असतो.

१. मुद्रा बाजारामुळे उद्योग व्यवसायाची अल्पकालीन कर्जाची गरज पूर्ण होते आणि अल्पकालीन कर्जाचा पुरवठा करणाऱ्या संस्थांना व्याजाच्या रुपाने उत्पन्न प्राप्त होते. मुद्रा बाजाराची गरज व्यापार व्यवसायाप्रमाणेच बँकिंग संस्थांना देखील आहे.

२. कोणत्याही उद्योग - व्यवसायासाठी कार्यशील भांडवलाचे महत्व मोठे आहे. मुद्रा बाजारात अल्पकालीन कर्जाची देवाण-घेवाण केली जाते. मुद्रा बाजारातून उपलब्ध होणारे कर्ज हे कार्यशील भांडवलच असते.

३. व्यापार - व्यवसायाप्रमाणेच अल्पकालीन कर्जाची गरज शेतीला सुद्धा असते. शेतकऱ्यांचे बी-बियाणे, रासायनिक खते, शेतमजुरांची मजुरी सारखे खर्च भागविण्यासाठी त्याला अल्पकालीन कर्जाची गरज असते व ही गरज मुद्रा बाजारातून पूर्ण होते. एकूणच शेतकऱ्यांना अल्पकालीन कर्जासाठी मुद्रा बाजाराची जशी गरज असते तशीच गरज कर्ज पुरवठा करणाऱ्या संस्थांना देखील असते.

४. मुद्रा बाजाराची गरज व्यापारी बँकांना देखील असते. व्यापारी बँका स्वत:जवळील अतिरिक्त पैसा अल्पकाळासाठी कर्जाऊ देतात व व्याजाच्या रुपाने उत्पन्न मिळवितात. मुद्रा बाजारामुळे वित्तीय संस्थांना देखील त्यांचा व्यवसाय करण्यास मदत होते.

५. सरकारला सुद्धा मुद्रा बाजाराची गरज असते. कोषागार हुंड्यांची विक्री करुन अल्पकालीन कर्जाची गरज भागविणे ही अत्यंत सुरक्षित मार्ग होय. अर्थात कोषागार हुंड्यांच्या विक्रीसाठी सुसंघटीत मुद्रा बाजार असणे आवश्यक आहे.

थोडक्यात देशाच्या उद्योग, व्यवसाय, शेती व बँकिंग क्षेत्राच्या विकासासाठी मुद्रा बाजाराची अत्यंत आवश्यकता असते.

## मुद्रा बाजाराची साधने (Instruments of Money Market)-

मुद्रा बाजारात विविध पतपत्रांच्या सहाय्याने अल्पकालीन कर्जाची देवाण-घेवाण होत असते. ही सर्व पतपत्रे वेगवेगळी असतात. अल्पमुदतीची कर्जे गोळा करण्यासाठी मुद्रा बाजारात ज्या वित्तीय साधनांचा वापर केला जातो. त्यांना मुद्रा बाजारांची साधने असे म्हणतात. ती पुढीलप्रमाणे आहेत -

### १. व्यापारी पतपत्र (Commercial Paper)-

व्यापारी पतपत्र हे कर्जाचे साधन आहे. जे मुद्रा बाजारातून अल्पमुदतीची वित्तीय साधन संपत्ती गोळा करण्यासाठी निगम गृहांकडून विक्रीस काढले जातात. विक्री करणाऱ्या कंपनीला हे व्यापार पतपत्र विकण्यासाठीचे सर्व खर्च करावे लागतात. उदा. विक्रेता किंवा मध्यस्थ यांची फी, व्याजाचा दर इत्यादी अतिअल्पकालीन गुंतवणूक बाजार व विदेशी विनिमय बाजारामध्ये सध्या अस्तित्वात असलेल्या दरांनी या साधनांची विक्री योग्य बाजार किंमत प्रभावित होत असते. या साधनांची मुदत १५ दिवस असते.

### २. व्यापारी विपत्र किंवा हुंडी (Commercial Bill)-

हे एक सर्वमान्य व्यापारी विपत्र आहे जे व्यापारी आणि उद्योगाच्या अल्पमुदतीच्या पतकर्जाची गरज भागविण्यासाठी आहे. अल्पमुदतीच्या गुंतवणूकीची तरलतेची गरज भागविण्यासाठी बॅंका पुनर्वजावटीवर हे विपत्र देतात. या व्यापारी विपत्रांची गुंतवणूकीची तरलता सर्वात जास्त आहे. हे व्यापारी विपत्र तीन महीने मुदतीची असतात. मात्र विपत्र पद्धतीचा अभाव, जास्त मुद्रांक शुल्क, पुरेशा पतश्रेणीचा अभाव, दुय्यम बाजारांचा अभाव इत्यादी कारणांमुळे मुद्रा बाजारात व्यापारी विपत्र विकसीत झाले नाही.

### ३. राजकोषपत्रे किंवा कोषागार हुंडी (Treasury Bill)-

राजकोषपत्र ही वचनचिठ्ठीच्या स्वरुपासारखी असतात. सरकारला कर्जाची आवश्यकता असते तेव्हा सरकार राजकोषपत्रे किंवा कर्जरोखे विकून कर्ज उभारत असते. सरकारी कर्जरोखे दीर्घमुदतीचे असू शकतात. सरकार हे पत्र संस्था किंवा जनतेसाठी विक्रीस काढते कारण उत्पन्न व खर्च यामधील तफावत भरुन काढण्यासाठी हे पत्र मुदतीचा निधी गोळा करते. या राजकोषपत्रांची मुदत १८२ दिवसांची असते.

### ४. सरकारी प्रतिभूती (Government Securities)-

केंद्र सरकार, राज्य सरकार तसेच स्थानिक सरकार प्रतिभूती विक्रीस काढू शकतात. सरकारतर्फे निर्गमित प्रतिभूतींमध्ये केलेली गुंतवणूक सुरक्षित असते. कारण सरकार व्याज देण्याचे व कर्जाची मूळ रक्कम परतफेड करण्याचे वचन देते. केंद्र सरकारतर्फे निर्गमित प्रतिभूतींच्या गुंतवणूकीची तरलता जास्त असते. सरकारी प्रतिभूती भागसाठा प्रमाणपत्र, वचननामा आणि वाहक बंधपत्राच्या स्वरुपात असतात.

### ५. ठेव प्रमाणपत्र (Certificate of Deposite)-

ठेव प्रमाणपत्र हे चलनक्षम मुदत ठेव प्रमाणपत्र आहे. हे प्रमाणपत्र व्यापारी बँका किंवा वित्तीय संस्था दर्शनी किंमतीवर किंवा बाजार किंमतीवर किंवा कसरीवर विक्रीस काढतात. या प्रमाणपत्रांची मुदत १५ दिवस ते १ वर्ष असते. व्यक्ती, संस्था, कंपनी, विश्वस्त मंडळ हे या ठेवपत्राचे वर्गणीदार असतात. ठेव प्रमाणपत्र १५ दिवसानंतर हस्तांतरीत होते. हे प्रमाणपत्र तारण नसलेल्या वचनचिठ्ठीच्या स्वरुपात असते व त्यावर मुद्रांक शुल्क द्यावे लागते.

### ६. मुद्रा बाजार परस्पर निधी (Money Market Mutual Fund)-

मुद्रा बाजाराचे एक महत्वाचे साधन म्हणजे मुद्रा बाजार परस्पर निधी आहे. हा निधी कर्जाच्या स्वरुपात असतो. यात तरलतेचे प्रमाण फार जास्त असते. हे एक वर्षापेक्षा कमी मुदतीसाठी असतात. ही गुंतवणूक सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य आहे. सरकार, बॅंका, नगरपालीका यांनी विक्रीस काढलेल्या गुंतवणूकीच्या साधनांमध्ये मुद्रा बाजार निधीमधील मालमत्तेची गुंतवणूक सुरक्षित व स्थिर असते. परस्पर निधी किरकोळ गुंतवणूकदारांना मुद्रा बाजारातील साधनांमध्ये गुंतवणूक करण्याची संधी देतात आणि किंमतीच्या नफ्याचा फायदा त्यांना करुन देतात.

### ७. रिझर्व्ह बॅंकेचा पुनर्खरेदी कराराचा दर (Reserve Banks Repurchase Agreements)-

हा एक पूनर्खरेदी दर आहे ज्याला अधिकृत 'कसरीचा दर' (Bank Rate) म्हणतात. हा कसर व्याजदर असतो, ज्यावर केंद्रीय (मध्यवर्ती) बॅंक सरकारी प्रतिभूतींची पुनर्खरेदी करते. पुनर्खरेदीचा व्यवहार केंद्रीय बॅंक इतर बॅंकेशी करते. याचा मुख्य उद्देश अल्पमुदतीची तरलता कमी करणे हा आहे. देशातील मुद्रेच्या पुरवठ्यात वाढ करण्यासाठी केंद्रीय बॅंक हा दर (Reporate) कमी करते, तर मुद्रेच्या पुरवठ्यात घट करण्यासाठी हा दर वाढविते. प्रतिभूतींचे मूल्यांकन बाजार किंमत व त्यावर जमा झालेल्या व्याजावर केले जाते.